म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय काद.वा.
दा. क्र. 3830

# नाट्याचार्य खाडिलकर

IRBK-0103830
IRBK-0103830

महाराष्ट्राचे सं[illegible]क — ८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय ...
ग्रा. नं. ...



# नाट्याचार्य खाडिलकर

— दौ. वे. शिरोळे

कार्जीटपळे
[illegible]र्इ - सदन
[illegible]व, मुंबई

आतां भारत स्वतंत्र झाला आहे. आपला महाराष्ट्रही पुनरपि स्वातंत्र्य भोगीत आहे. सतराव्या शतकांत छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राला जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दिलें, तें इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. आपल्या मायभूमीला तिच्या हक्काचें तें सिंहासन परत मिळवून देण्यासाठीं जे कोणीं झटले व झगडले अशीं नररत्नें अनेक आहेत हें आपलें भाग्य होय.

स्वतंत्र वृत्ति व त्यागबुद्धि हे महाराष्ट्राचे विशेष गुण – त्याच्या सह्याद्रि-विंध्याद्रींइतकेच उत्तुंग व अभेद्य. ह्या गुणांची गरज स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं जितकी होती, तितकीच ह्यापुढेंही लागणार आहे. केवळ राजकीय पारतंत्र्य गेलें म्हणजे सर्वांगीण स्वातंत्र्य आलें असें थोडेंच आहे? आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, इत्यादि सर्व क्षेत्रांत आपल्याला स्वतंत्र व्हावयाचें आहे, नवा महाराष्ट्र, नवा भारत उभारावयाचा आहे. त्यासाठीं पुढील पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें, नवीं श्रद्धास्थानें ठेविलीं पाहिजेत. अनास्था, आळस व भोगलोलुपता ह्यांच्या चिखलांत तरुण महाराष्ट्रीयानें रुतून बसतां कामा नये. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें रक्त नवीन पिढीच्या नसांतून खेळेल, तरच आपला महाराष्ट्र, आपला भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शकेल.

ह्या गुणांचें बीजारोपण कसें होणार? एक मार्ग म्हणजे त्या गुणांचे पुतळे असलेल्या पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें समजावून सांगणें. महाराष्ट्राला आंग्लशाहींतून मुक्त करण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं लोकोत्तर गुण प्रगट केले, अशांचीं बारा चरित्रें, त्या त्या गुणांवर भर देऊन, लिहिण्याचें मीं योजिलें आहे. राजकीय दृष्टीनें मृतवत् झालेल्या महाराष्ट्राला संजीवन देणाऱ्या विभूतींचीं हीं चरित्रें त्याला नैतिक, सामाजिक, आर्थिक, इत्यादि क्षेत्रांतही नवजीवन देण्यास समर्थ ठरतील असा मला विश्वास वाटतो. महाराष्ट्राच्या कुशींतून असे थोर पुरुष "झाले आहेत, पुढें होणार" हा श्रीसमर्थांचा आशीर्वाद म्हणजे आपला संजीवनीमंत्रच आहे, नाहीं का?

दा. न. शिखरे

'महात्मा' कार्यालय, नातूबाग,
पुणें २, ता. १५ मे, १९५१

महाराष्ट्राचे संजीवक
....८....

# नाट्याचार्य खाडिलकर

लेखक

दा. न. शिखरे, एम्. ए.

3830

क्र. 3830

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

*****

मूल्य

IRBK-0103830

IRBK-0103830

# अनुक्रम


कृष्णाकांठचें वारें ... ... ३

केसरी संस्थेंत प्रवेश ... ७

हिमालयाच्या शिखरावर ... ११

ध्येयवादी नाटककार ... २२

केसरीचे संपादक ... ... २८

स्वतंत्र कर्तृत्व ... ... ३८

भरतवाक्य ... ... ४९



सर्वाधिकार प्रकाशकाधीन



पहिली आवृत्ति : १९५३

मुद्रक : बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २



# कृष्णाकांठचें वारें

आईविरुद्ध मुलाचा सत्याग्रह ! मग त्यांत कोण जिंकेल ?

मुलानें खोड्या केल्या. “ कृष्णा, नको रे असं करूं ” अशीं आर्जवें आईनें केलीं. पण छट् ! कृष्णाचा हूडपणा थांबेना. आई रागावली, वैतागली. तिनें कृष्णाला खोलींत कोंडून घातलें. पण कृष्णा तिचाच मुलगा. त्याचा स्वभाव भारी हट्टी. “ आई आपल्याला शिक्षा करते काय ? आईलाच आपण शिक्षा करूं या. ” कृष्णाच्या बालमनांत विचार आला. त्यानें खोलीला आंतून कडी घातली. तास झाला, दोन तास झाले, तरी खोली शांत ! आईला नवल वाटलें. जेवावयाची वेळ झाली. मुलाला टाकून आई कशी जेवील ?

...२...

## कृष्णा कांठचें वारें


*******************



सौ. गौरी खाडिलकर

इंग्रजी तिसरींत असतांना कृष्णानें एक छोटेंसें नाटक लिहिलें. त्याचें बक्षीस काय ? तर मोठ्या माणसांनीं त्याला नांवें ठेवलीं. पुढें तें नाटक अग्निमुखीं पडलें.

हुशार विद्यार्थी म्हणून कृष्णानें लौकिक संपादला. सातवीपर्यंत त्याला शिष्यवृत्ति मिळत गेली. शाळेच्या वादविवादमंडळांतही त्याच्या वाणीचा जोरकसपणा चमकत असे. इंग्रजी सहावी-सातवींत गेल्यावर कृष्णाला संस्कृत अभ्यासाची गोडी लागली. त्यांतही उत्तर-रामचरित नाटकावर त्याचें मन मोहित झालें. पुढें तर त्यानें तें नाटक पाठच केलें. ह्याच सुमारास कोल्हापूरच्या लागूंची वेणू हिच्याशीं त्याचें लग्न झालें. वेणूचें सासरचें नांव गौरी ठेवण्यांत आलें. तिचें शिक्षण मराठी पांचव्या इयत्तेपर्यंत झालें होतें. त्या काळीं तें शिक्षण व तें वय पुष्कळच होतें.




# केसरी संस्थेंत प्रवेश

कृष्णा १८८९ सालीं चांगले गुण मिळवून मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाला. पुढें तो पुण्यास आला. टिळक-चिपळूणकरांच्या फर्ग्युसन कॉलेजांत मोठ्या आशेनें व अभिमानानें त्यानें नांव घातलें.


चिपळूणकर

कॉलेजांतही त्याला शिष्यवृत्ति मिळाली. तेथें त्यानें इंग्रजी वाङ्मयाचा कसून अभ्यास केला. त्यांतही नाट्य-वाङ्मयाची तर त्याला विशेष गोडी.



लोकमान्य टिळक

स्पष्टपणें अनुभवास आला. त्या वेळीं केसरी हा महाराष्ट्रीय तरुणांचा जीव कीं प्राण होता. मंगळवार उजाडला कीं त्यावर तरुणांच्या उड्या पडत. टिळक हे तरुणांचे गुरु होते, नेते होते. त्यांच्या स्वातंत्र्यविषयक विचारांनीं खाडिलकरां-सारख्या भावनाप्रधान तरुणांचीं डोकीं भणाणून जात. महाराष्ट्राची नाडीच त्यांच्या हातांत होती. अशा तेजस्वी नेत्याचा सहवास कोणाला नकोसा वाटेल! "तुम्हांला लेखनाची हौस आहे तर केसरींत कां जात नाहीं?" असें खाडिलकरांना कानिटकरांनीं विचारलें. खाडिलकरांनीं चटकन होकार दिला. ते पुण्यास गेले, टिळकांना भेटले. टिळकांनीं खाडिलकरांना सांगितलें, "राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता ह्या विषयावर एक लेख लिहून आणा." रविवारीं लेखाची सूचना, सोमवारीं लेख तयार आणि मंगळवारीं तारीख १ सेप्टेंबर १८९६ रोजीं केसरींत तो लेख प्रसिद्ध! आणि तोही अग्रलेख म्हणून!!

खाडिलकरांचा आनंद गगनांत मावेना!!!



# हिमालयाच्या शिखरावर

कोठें कृष्णातीर आणि कोठें गंगातीर ! कोठें महाराष्ट्रांतला सह्याद्रि आणि कोठें उत्तरेचा हिमालय ! पण राष्ट्रभक्ति इतकी प्रबळ, स्वातंत्र्यप्रीति इतकी अनावर कीं त्यांच्या झंझावातामुळें कृष्णेच्या कांठावर खेळणारे खाडिलकर गंगेच्या तीरावर वावरूं लागले आणि सह्याद्रीची सावली सोडून हिमालयाच्या बिकट वाटेस लागले.

केसरींत शिरणें म्हणजे नुसतें लेखन करणें नव्हे. टिळकांचा केसरी म्हणजे कागदी वर्तमानपत्र नव्हतें, तें स्वातंत्र्याचें प्रभावी शस्त्र होतें. तेव्हांची केसरी संस्था म्हणजे लेखकांचा अड्डा नव्हता,

*****************
स्वातंत्र्यसैनिकांचा तळ होता. त्या छावणींत राहून कैक स्वातंत्र्य-सैनिकांनीं राष्ट्राची सेवा केली. त्यांपैकींच खाडिलकर एक होते. त्यांचा पहिला लेख केसरीचा अग्रलेख म्हणून आला, तेव्हां त्यांना साहजिकच धन्य वाटलें. त्यांच्या वडील बंधूंनींही त्यांची पाठ थोपटली. पण देशभक्ति म्हणजे सतीचें वाण. जिवावर उदार होऊनच ती साधतां येते. टिळक नुसते केसरींत जळजळीत लिहीत नसत, तर लोकांना सज्ञान व संघटित करण्यासाठीं प्रत्यक्ष प्रयत्न करीत, त्यांच्या अडचणी, तक्रारी व दुःखें ते समजावून घेत व दूर करण्याचा प्रयत्न करीत. त्यासाठीं ते रात्रंदिवस तळमळत व कष्ट करीत. आणि खाडिलकर म्हणजे टिळकांचे सहकारी. त्यांच्याही वांट्याला तेंच काम आलें.

१८९६ सालीं महाराष्ट्रांत मोठा दुष्काळ पडला. लोकांना अन्न व गुरांना चारा मिळेनासा झाला. सरकारनें दुष्काळी कामें काढलीं पण त्यांचा फायदा जनतेला पुरेसा मिळेना. तेव्हां टिळकांनीं आपले कार्यकर्ते दुष्काळी भागांत पाठविले. त्यांनीं खाडिलकरांना सोलापूर व विजापूर जिल्ह्यांत रवाना केलें. त्या दुष्काळी जिल्ह्यांतील दूरदूरच्या खेड्यांनादेखील खाडिलकर भेट देऊन आले. तेथें आपल्या व्याख्यानांतून ते सरकारी मदतीची माहिती लोकांना देत. उलट लोकांच्या तक्रारी काय आहेत त्या समजावून घेऊन ते केसरींत त्या प्रसिद्ध करीत.

दुष्काळाच्या मागोमाग प्लेगोबाची स्वारी आली. पुण्यास प्लेगनें कहर केला. त्याहून कहर केला गोऱ्या सोल्जरांनीं. लोकांना ' दे माय धरणी ठाय ' झालें. टिळकांनीं दवाखाना काढला, लोकांना

धीर दिला आणि सरकारला जाब विचारला. खाडिलकर प्लेगमुळें पुणें सोडून सांगलीस गेले. तेथें खाडिलकरांनीं ‘ कांचनगडची मोहना ’ हें नाटक लिहिलें. दुष्काळी दौऱ्यावर असतांना विजापूरचा उध्वस्त किल्ला पाहून त्यांच्या मनांत ज्या देशाभिमानाच्या भावना उसळल्या त्या त्यांनीं ह्या नाटकांत रसरशीतपणें मांडल्या आहेत.



शिवाजीमहाराज

टिळकांच्या निरोपावरून खाडिलकर १८९७ च्या मे मध्यें सांगलीहून पुण्यास परत आले. शिवजयंतीचा उत्सव टिळकांनीं सुरू केला होता. स्वातंत्र्याची ज्योत पेटविण्यास शिवचरित्रासारखा दुसरा प्रदीप्त अग्नि कोणता ? खाडिलकरांनीं ‘ विभूति-पूजा ’ ह्या नांवाचा लेख केसरींत लिहून शिवाजी-उत्सवाला मोठी चालना दिली.

शिवाजी-उत्सव संपतो न संपतो तोंच पुणें येथें एक खून झाला. प्लेगच्या निमित्तानें लोकांना बेसुमार छळणारा सरकारी अधिकाऱ्यांचा म्होरक्या रॅन्ड नांवाचा होता. त्याचा खून चापेकर-बंधूंनीं केला. सरकार चिडलें. त्यानें भयंकर दडपशाही सुरू केली. तेव्हां, ‘ सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय ? ” असा बेदरकार सवाल



बाळकृष्ण हरि चापेकर



वासुदेव हरि चाफेकर

टिळकांनीं केसरींतून सरकारला केला. "राज्य करणें म्हणजे सूड उगविणें नव्हे." असेंही त्यांनीं सरकारला बजाविलें. ह्यामुळें सरकारची आपल्यावर वक्रदृष्टि होईल हें ते ओळखून होते, म्हणून त्यांनीं केसरींत अग्रलेख लिहून सरकारला खडसाविलें, "राजद्रोह कशाला म्हणतात ?"

ता. २७ जुलै १८९७ रोजीं सरकारनें टिळकांना अटक केली. ती अटक ज्या लेखासाठीं झाली तो लेख मात्र त्यांनीं लिहिला नव्हता, खाडिलकरांनीं लिहिलेला होता. टिळकांच्या तीव्र स्वराशीं सुसंवादी असाच सूर खाडिलकर लावीत असत. टिळकांना शिक्षा झाली तरी खाडिलकरांनीं पहिल्याच रंगेलपणानें व बेडरपणानें केसरी चालू ठेवला. "परसत्तेखालीं उच्च विचार व उदात्त मनोविकार ह्यांचाही फैलाव प्रसंगविशेषीं राजद्रोही असूं शकतो." अशी टीका त्यांनीं सरकारवर केली.



दामोदर हरि चाफेकर

टिळक तुरुंगांत गेल्यानंतर केसरी-कचेरींत दुसरीच एक अडचण उत्पन्न झाली. केसरी आर्यभूषण छापखान्यांत छापला जाई. पण खटल्यानंतर केसरी छापण्याची जबाबदारी आर्यभूषणचे

व्यवस्थापक अंगावर घेईनात. शेवटीं फार प्रयत्नानें केसरी विठ्ठल छापखान्यांत छापला जाऊं लागला. एक वर्षभर खाडिलकरांनीं केसरी अशा शौर्यानें व शिताफीनें चालविला कीं वाचकांना वाटावें, टिळकच लिहीत आहेत!


शिवरामपंत परांजपे

ता. ६ सेप्टेंबर १८९८ रोजीं टिळक तुरुंगांतून सुटून आले. नंतर त्यांनीं मद्रास, सिलोन, ह्या प्रदेशांकडे प्रवास केला. ता. ४ जुलै १८९९ रोजीं टिळकांनीं केसरी पत्रावर संपादक म्हणून आपलें नांव घातलें आणि 'पुनश्च हरिः ॐ' अशी गर्जना केसरींतून केली. त्या लेखांत टिळकांनीं खाडिलकरांना चांगलेंच प्रशस्तिपत्र दिलें. टिळकांनीं लिहिलें :

" सांधा जितका बेमालूम जडेल, किंबहुना सांधा केला आहे कीं नाहीं, ह्याचीच परीक्षकास भ्रांति पडेल तेव्हांच त्यांत सांधा लावणाराचें कसब दृष्टीस येतें. तशा प्रकारचा बेमालूम सांधा वरील गृहस्थांनीं जडविला होता हें केसरीच्या वाचकांना कळून आलेंच आहे. रा. रा. खाडिलकर ह्यांचें नांव जबाबदार प्रकाशकांत जरी दाखल केलें नव्हतें तरी केसरींतील बहुतेक एडिटोरियल लेख त्यांच्याच हातचे आहेत हें येथें सांगणें जरूर आहे. "

ह्या वेळीं प्रो. शिवरामपंत परांजपे ह्यांनीं 'काळ' पत्र सुरू केलें होतें. त्यांतही खाडिलकर मधून मधून लिहीत. एकदा तर सर्वच्या सर्व काळ पत्राचा अंक लिहिण्याची जबाबदारी खाडिलकरांवर

येऊन पडली. टिळक-खाडिलकरांची लेखनशैली शत्रूवर समोरासमोर उभें राहून, दांतओठ खाऊन व आव्हान देऊन घाव घालणारी; तर परांजप्यांची लेखणी म्हणजे शत्रूला नकळत त्याचें काळीज कापून टाकणारी. उपरोधाची धार त्याला फार. दोन शैलींत असा फरक असला तरी खाडिलकरांनीं शिवरामपंतांच्या संस्कृतप्रचुर, काव्यमय पण उपरोधानें तीक्ष्ण बनलेल्या लेखनपद्धतीचा बेमालूम नमुना वठविला.

१९०१ सालीं कलकत्ता येथें राष्ट्रसभेचें अधिवेशन भरलें. त्याला टिळक गेले होते. तेथें त्यांनीं एका बंगाली मुलींच्या शाळेला भेट दिली. शाळेच्या चालक 'माताजी' नांवाच्या बाई होत्या. त्या शुद्ध मराठींत बोलूं लागल्या, तेव्हां टिळकांना आश्चर्य वाटलें. 'माताजी' मूळच्या तंजावरच्या. यात्रेसाठीं त्या नेपाळला गेल्या. तेथील राजाजवळ त्या राहिल्या. पुढें कलकत्त्यास येऊन त्यांनीं मुलींची शाळा काढली. नेपाळ हें स्वतंत्र राज्य. तेव्हां त्या सरकारचा फायदा टिळकांनीं आपल्या देशाला स्वतंत्र करण्याचे कामीं करून घ्यावा असें माताजींनीं सुचविलें. नेपाळमधील मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांशीं माताजींचे चांगले संबंध होते.

टिळक काय? स्वातंत्र्यासाठीं ध्रुवावर किंवा मंगळावरही जाण्यास तयार झाले असते. लगेच ते नेपाळकडे निघाले. पण त्यांच्याजवळ परवाना नव्हता म्हणून त्यांना परत यावें लागलें. फक्त पशुपतेश्वराच्या यात्रेच्या वेळीं परवान्याशिवाय कोणालाही नेपाळांत जातां येतें. पुण्यास परत आल्यावर टिळकांनीं खाडिलकरांना आपला सारा व्यूह समजावून सांगितला. खाडिलकरांचें रक्तही स्वातंत्र्यानें

रसरसणारें. स्वातंत्र्यासाठीं कोणतेंही धाडस करण्यास, कोणतेंही संकट अंगावर घेण्यास त्यांचें मन तयार होतें, आतुर होतें. सांगली, पुणें व मुंबई ह्या त्रिकोणापलीकडे न गेलेले खाडिलकर हिंदुस्थान देशाच्याही बाहेर जाण्यास एका पायावर तयार झाले. नेपाळांत शस्त्रें जमवून हिंदुस्थानांत बंड करावें आणि इंग्रजांना पिटाळून लावावें ह्या ध्येयासाठीं त्यांनीं आपलें शिर तळहातावर घेतलें. शिवाजीचा शब्द येतांच तानाजीनें सिंहगड चढण्याची उभारी ज्या हिरीरीनें धरली असेल, त्याच उभारीनें खाडिलकर नेपाळास जावयास सिद्ध झाले.

एखाद्या सेनापतीप्रमाणें, तुताऱ्या फुंकीत व झेंडे नाचवीत, आपलें सैन्य पाठीशीं घेऊन, खाडिलकर नेपाळला निघाले होते काय? त्यांना लपून जावयाचें होतें – छपून काम करावयाचें होतें. रायफली तयार करण्याचा कारखाना त्यांना नेपाळांत काढावयाचा होता. पण मंगलोरी कौलांचा कारखाना काढण्यासाठीं म्हणून ते निघाले. नेपाळांत त्यांना 'टाईल (Tile) भटच' म्हणत.

ग्वाल्हेरला केतकर नांवाचे एक मेकॅनिकल इंजिनिअर होते. त्यांच्याजवळ रायफलीच्या यंत्राचे नकाशे होते. खाडिलकरांनीं त्यांना अडीचशें रुपये दिले व ते नकाशे घेतले. त्या वेळीं जर्मनींतील क्रुप्स कारखान्याचे एजंट कलकत्त्यांत होते. त्यांच्यामार्फत रायफलीच्या यंत्राची ऑर्डर खाडिलकरांनीं जर्मनींत दिली. त्यासाठीं पांच हजार रुपये द्यावयाचे होते, ते खाडिलकरांनीं छत्रे सर्कशीच्या मालकांकडून घेतले. त्या सर्कशीबरोबर खाडिलकर तीन महिने होते. त्या अवधींत ते घोड्यावर बसण्यास शिकले. बंदूक मारण्याची कला ते

सांगलीसच शिकले होते. हरिपूरजवळ एक ओहोळ आहे. त्याच्या दोन्ही बाजूंस दरड आहे. एका दरडीवर नारळ ठेवून व दुसऱ्या दरडीवर उभे राहून नारळाला गोळी मारण्याचा अभ्यास त्यांनीं केला होता. कौलाच्या कारखानदाराचें सोंग नीट साजण्यासाठीं खाडिलकरांनीं जबलपूर येथील कौलांचा कारखाना पाहिला व तेथून जरूर ती माहिती मिळविली. कलकत्त्यास माताजींनीं नेपाळचे कर्नल इंजिनिअर कुमार नरसिंगराणा ह्यांना देण्यासाठीं खाडिलकरांना पत्र दिलें, त्यांत खाडिलकरांची ओळख 'कौलाचे कारखानदार' अशीच करून देण्यांत आली. कोणत्याही मिषानें कां होईना त्यांना स्वतंत्र भूमींत प्रवेश करावयाचा होता आणि आपल्या देशाचें पारतंत्र्य नाहींसें करावयाचें होतें. ह्याच एका विचारानें भारले जाऊन खाडिलकर नेपाळकडे निघाले.

हिमालय! सर्व नगांचा अधिराज! पर्वतांचा पिता, गंगासिंधूची माता. तेथें वास करणाऱ्या सिद्ध-किन्नरांचें मनोहर वर्णन कालीदासानें कुमारसंभवांत केलेलें काकासाहेबांनीं महाराष्ट्रांत राहून कितीतरी वेळां वाचलें होतें. भगवान् शंकराचा कैलास हिमालयावरच आणि राजहंसांचें क्रीडास्थान असलेलें मानस सरोवरही हिमालयावरच. सह्याद्रीचा काळाकभिन्न फत्तर पाहाणाऱ्या काकासाहेबांच्या काव्यचक्षूंपुढें चांदीच चांदी दिसूं लागली. बर्फाचे शुभ्र झरे तळपत्या उन्हांत चांदीच्या झऱ्याप्रमाणें चमकतांना त्यांना दिसत. अस्मानाला भिडणाऱ्या व त्यांना भेदून जाणाऱ्या त्या हिमालयाच्या उंचच उंच शिखरांकडे पाहिलें व त्यावरील लखलखणारें पांढरें शुभ्र बर्फ दृष्टीस पडलें, म्हणजे काकासाहेबांच्या

काव्यदृष्टीला वाटे, चांदीचे मुकुट घालून हे शेकडों राजेमहाराजे आपल्या सत्कार्याला आशीर्वाद देण्यासाठींच उभे आहेत ! आणि प्रातःकाळीं किंवा सायंकाळीं त्या गिरिशिखरावरील बर्फावर सूर्याचे तांबूस किरण पडले म्हणजे सोन्याचे किरीट घालून स्वर्गांतून देवच खालीं उतरले आहेत असें त्यांना वाटे ! ! उगाच नाहीं कविकुलगुरु कालीदासानें हिमालयाला ' देवतात्मा ' म्हटलें !

हिमालयाच्या अंगावरून जात जात काकासाहेब काटमांडूला पोचले. तें शहर म्हणजे नेपाळची राजधानी. त्याची वस्ती वीस हजार. एक रुपयास मणभर तांदूळ व एक आण्यास शेरभर दूध अशी स्वस्ताई तेथें होती. काकासाहेबांचा दरबारांत प्रवेश झाला. पायांत बूट, सुरवार, अंगांत कोट व डोक्यावर टोपी, असा पोशाख ते करीत. महाराजांच्या भेटीला जातांना दरबारी पद्धतीचा पोशाख घालीत. चारमजली घरांत ते राहात. तेथून दीड मैलावर कौलांचा कारखाना होता. त्या कारखान्यांत तीनचारशें मजूर होते. तेथें जुन्या तऱ्हेचीं कौलें तयार होत असत. पण खाडिलकरांनीं नव्या तऱ्हेचीं मंगलोरी कौलें तयार करण्यास सुरुवात केली. त्यांत त्यांना यश आलें. त्याबद्दल त्यांना तीन हजार रुपये देण्यांत आले.

पण आपल्या देशावर स्वातंत्र्याचीं कौलें घालावीं हीच त्यांची खरी मनीषा. त्यासाठीं कलकत्त्याला ते वारंवार जात. जर्मन एजंटाला भेटत. एकदा त्या एजंटानें त्यांना एक छोटें पिस्तूल दिलें. तें घेऊन ते नेपाळला गेले.

ह्याच सुमारास जर्मनीहून मागविलेलें बंदुका तयार करण्याचें यंत्र हिंदुस्थानांत आलें. त्यानें नेपाळची हद्द ओलांडली. तें गाड्यावर



# ध्येयवादी नाटककार

"आई, गुलाम होणं म्हणजे काय ग ?"

बाळ रोहिदास राणी तारामतीला विचारीत होता. गुलाम झालेल्या तारामतीच्या डोळ्यांतून अश्रु वाहात होते. पुन्हा रोहिदासानें तोच प्रश्न केला. पुन्हा राणी हुंदके देत रडूं लागली.

पण माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली भारतमाता, हरिश्चंद्राची तारामती नाहीं. मला रंगभूमीवर दिसूं लागला हिंदी तरुण, रोहिदास नव्हे. वास्तविक चाललें होतें एक नाटक. खाडिलकरांचें 'सत्त्वपरीक्षा' हें नाटक 'महाराष्ट्र नाटक मंडळीनें' पुण्याच्या रंगभूमीवर आणलें होतें. तें मी विद्यार्थी असतांना पाहात

होतों पण दिसत होती नाट्यसृष्टीच्या ऐवजीं सत्यसृष्टि आणि हरिश्चंद्राऐवजीं लोकमान्य टिळक.



लॉर्ड कर्झन

आपल्या हातांतील भाकरीचा जळका तुकडा भिरकावून देऊन बाळ रोहिदास प्रतिज्ञा करतो कीं " हें पोट फेकून दिलं. माझी आई व माझे बाबा गुलामगिरींत असेतों अन्नाचा एक कणही माझी जीभ पोटांत लोटणार नाहीं. " ह्या प्रतिज्ञेचे पडसाद कितीतरी तरुणांच्या हृदयांत त्या वेळीं उमटले आणि त्यांनीं मनोमन प्रतिज्ञा केल्या, ' बेहेत्तर आहे उपाशीं राहिलों तरी, पण परक्या सरकारची नोकरी आपण कधींही करणार नाहीं. '

पारतंत्र्याविषयीं चीड, स्वातंत्र्याची लालसा, ध्येयासाठीं कष्ट भोगण्याची तयारी आणि समाजासाठीं स्वार्थावर पाणी सोडण्याची सिद्धता, इत्यादि उदात्त व उज्ज्वल गुणांचा संदेश देण्याचें एक साधन म्हणूनच खाडिलकरांनीं आपलीं वीरश्रीयुक्त व तत्त्वनिष्ठ नाटकें रचिलीं. केसरींतून तर ते ह्या गुणांची पेरणी वाचकांच्या मनोभूमींत करीत होतेच. पण जे विचार तेथें सरकारच्या दडपशाहीमुळें उघडपणें लिहितां येत नसत ते नाटकाच्या बुरख्यांतून खाडिलकर कुशलतेनें मांडीत. पौराणिक आख्यानें घेऊन त्यांतून सद्य:स्थितीला अनुकूल तो अर्थ काढण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. लॉर्ड कर्झन हे व्हाइसरॉय असतांना

हिंदुस्थानांत दडपशाहीचा नंगा नाच सुरू झाला. तिच्याविरुद्ध बोलण्याला किंवा लिहिण्यालाही चोरी !

तेव्हां खाडिलकरांनीं 'कीचकवध' नांवाचें नाटक लिहिलें. त्या नाटकांत कर्झनशाहीचेंच चित्र हुबेहूब रंगविलें आहे असें प्रेक्षकांना वाटत असे. एवढेंच नव्हे तर किंकेडसाहेबानें 'लंडन टाइम्स'मध्यें कीचकवध नाटकावर टीका करतांना असें म्हटलें कीं "हें नाटक म्हणजे एक रूपक आहे. कीचक म्हणजे कर्झन, द्रौपदी म्हणजे भारतमाता, युधिष्ठिर म्हणजे मवाळपक्ष, भीम म्हणजे जहालपक्ष आणि राजा विराट म्हणजे ब्रिटिश सरकार."

"सर्वांचा न्याय करण्यास परमेश्वर बसला आहे." ही सैरंध्रीनें कीचकाला दिलेली जरब म्हणजे गांजलेल्या हिंदी जनतेनें अरेराव कर्झनला दिलेला जबावच होय असें प्रेक्षकांना वाटे आणि त्यामुळें त्रस्त जनतेचाही धीर कायम राही आणि आशा अभंग टिके. "चांडाळा, सदाचारी लोकांचा नाहक छळ करण्याच्या तुझ्या पापामुळें क्रुद्ध झालेल्या परमेश्वरी शक्तीचे दूत तुझ्या पापाचा घडा केव्हां भरेल म्हणून, तुझ्याभोवतीं घिरट्या घालीत असून तुझा बळी घेण्यास टपलेले आहेत." ही सैरंध्रीची कडाडणारी शापवाणी तरुण प्रेक्षकांच्या कानांवर पडतांच त्यांच्या मुठी आवेशानें वळत, भुवया वर चढत आणि ते सरकारवर दांतओठ खाऊं लागत. खाडिलकरांच्या नाटकांतील अशीं भाषणें म्हणजे टिळकांच्या केसरींतील लेखांचे कलात्मक पडसादच. १९१० सालीं सरकारनें 'कीचकवध' नाटक जप्त केलें.

'भाऊबंदकी' नाटक हें पेशवाईवर रचलेलें. पण त्यांतील

रामशास्त्र्याचा प्रवेश पाहातांना लोकांना क्षणोक्षणीं भास होई लोकमान्य टिळकांचा. १९०९ च्या सेप्टेंबरांत भाऊबंदकीचा पहिला प्रयोग झाला. १९०८ सालच्या खटल्यांत टिळकांचा जो धैर्यशाली व तत्त्वनिष्ठ स्वभाव लोकांच्या नजरेस पडला, तोच ' भाऊबंदकीं ' तील रामशास्त्र्यांच्या रूपानें रंगभूमीवर मूर्तिमंत उभा राहात असे. सिंहासनावर बसलेल्या राघोबादादाला देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरा मार्गच नाहीं हे रामशास्त्र्याचे उद्गार महाराष्ट्रीय तरुणांच्या मनांत सारखे घुमत होते. ' सत्य बोलत असतानांच ह्या जिभेला काटून टाकून तिची समाप्ति आपण केली तर त्यांत मला समाधान आहे. ' हें रामशास्त्र्याचें वचन सत्यनिष्ठेचें व निर्भयतेचें तेज सहज उत्पन्न करी.

' मी दासी नाहीं, मी स्वतंत्र आहें. ' ही द्रौपदी नाटकांतील किंकाळी हिंदमातेचीच आहे असें वाटे.

सत्य, त्याग, सेवा, निर्भयता, शीलसंपन्नता, इत्यादि गुणांचा जणूं कांहीं मंत्रजागरच खाडिलकरांचीं नाटकें करीत. ' कांचनगडची मोहना ' ह्या नाटकांतील प्रेमाच्या भावनेवर देशाभिमानानें मात केलेली आहे. ' संताजीराव, आमची मान तुटेल, आमचीं हाडं चिंबून जाऊन त्यांचा चुराडा होईल; पण आम्ही संकटांना केसभरही हार जाणार नाहीं, हें शत्रूला आज पक्कं समजूं द्या. म्हणजे आम्ही जिवंत राहून जें कार्य आमच्या हातून पार पडणं अशक्य आहे, तें कार्य आमच्या मरणानें आपोआप होईल. ' अशा विचारांच्या ठिणग्या ह्या नाटकांतून अथपासून इतिपर्यंत एकसारख्या उडत आहेत.

'सवतीमत्सर' हें नाटक तर प्रभु रामचंद्राच्या सत्यनिष्ठेवरच उभारलेलें आहे. त्यांत राम म्हणतो, 'माझ्या बाहूंतील शक्ति म्हणजे सत्याची शोभा होय. सत्यपालनाला उचलून धरण्याकरितां पराक्रम आहे, सत्याची गळचेपी करण्यासाठीं नाहीं.' आदर्श राजा, आदर्श पुत्र, आदर्श पत्नी, आदर्श कन्या, असे अनेक आदर्श निर्माण करणारी खाडिलकरांची नाट्यकला म्हणजे एक मनोहर आरसेमहालच आहे. 'माझं प्रेम मृत्यूसकट तिकडच्या चरणांचा स्वीकार करीत आहे.' अशी अचल निष्ठा सावित्री प्रगट करते, तर 'स्वयंवरां'तील रुक्मिणी 'स्वकुलतारकसुते'ची महति गाते.

स्वयंवर नाटक हें सुरतेच्या मोडलेल्या कॉंग्रेसवर रूपक आहे. त्यांतील 'मी राजा नाहीं किंवा राजपुत्रही नाहीं. मी गवळ्याचा धंदा करणारा आहें.' असें छातीठोकपणें सांगणारा कृष्ण म्हणजे टिळकच होत असें प्रेक्षक समजत. रुक्मिणीप्रमाणें जनताही वैभवापेक्षां पराक्रमावरच भाळते, हाच सिद्धान्त 'मानापमानांत'ही रंगविला आहे.

पंचशरें गद्यवरें वश जी केली ।
नाट्यकला कवि कृष्णा माला घाली ॥

हें खाडिलकरांनीं स्वतःचें केलेलें वर्णन अगदीं यथार्थ आहे.

त्यांचीं गद्य नाटकें जितकीं यशस्वी झालीं, तितकींच संगीत नाटकेंही लोकप्रिय ठरलीं. स्वभावांचे खटके, प्रसंगांची चकमक, अभिनयाला अनुकूल अशी भाषा, रसाचा उत्कृष्ट परिपोष आणि ह्या सर्वांचें पर्यवसान तत्त्वनिष्ठेंत झालेलें, ह्या गुणांमुळें खाडिलकरांच्या नाटकांवर प्रेक्षकांच्या उड्या पडत. त्यांतही त्यांचें भाग्य असें कीं

## सुगंधी सोन्याच्या खाणी


बालगंधर्व

संगीत नाटकांतील नायिकांचें काम करण्यासाठीं बालगंधर्वांसारखा नट लाभला. शतकांत एखादाच निर्माण व्हावा असा हा अद्वितीय कलावंत आहे. बालगंधर्वांच्या मधुर स्वरानें आणि मोहक अभिनयानें खाडिलकरांच्या नाटकांची लोकप्रियता कळसास पोचविली. सोन्याला सुगंध सुटावा तसा हा अपूर्व योग मराठी रंगभूमीवर घडून आला. त्यामुळे स्वयंवरादि नाटकें म्हणजे सोन्याच्या खाणी ठरल्या. 'दर्शन गुणवंताचें नाचवि प्रेमलहरी' हा अनुभव त्या नाटकानें सतत दिला.

मेनका, सावित्री, द्रौपदी, वगैरे त्यांचीं पुढील नाटकें म्हणजे सेवा, त्याग, स्नेह, इत्यादि गुणांचे कलारुचिर वस्तुपाठच! 'उपभोगाची वेळ येतां स्वार्थत्यागी तो राहिला' अशी उदात्त मनोवृत्ति त्यांनीं किती तरी नाटकांत रंगविली आहे. खाडिलकरांचीं नाटकें म्हणजे खरोखर आमची अक्षय्य टिकणारी राष्ट्रीय संपत्तिच होय!



# केसरीचे संपादक

हरिश्चंद्रानें राज्याचा त्याग केला, रामचंद्रानें वनवास भोगला, रामशास्त्र्यानें न्यायाधीशपद सोडलें, पण ह्या सर्वांनीं आपली सत्यभक्ति, आपली तत्त्वनिष्ठा, आपला बाणेदारपणा कायम राखला. ह्याचीं सुंदर चित्रें खाडिलकरांनीं आपल्या नाटकांत उभीं केलीं. पण त्यांतच त्यांचें मोठेपण होतें असें नव्हे. नुसतें रसभरित वर्णन काय ? पुराणिक व कीर्तनकार देवळांदेवळांतून करीत असतात, पण आपल्यावर प्रसंग आला असतां त्या गुणांची चमक आपल्या वर्तनांत दाखविणारे काकासाहेब एखादेच ! तसे कसोटीचे प्रसंग काकासाहेबांच्या आयुष्यांत अनेक आले.

नेपाळहून परत आल्यावर १९०५ सालीं ऑगस्ट महिन्यांत खाडिलकर केसरींतील कामावर रुजू झाले. टिळकांच्या नेतृत्वाखालीं खाडिलकरांनीं त्यांच्या राजकारणाचा त्यांच्याच जोरकसपणानें पुरस्कार केला. देशांत दुष्काळ, दारिद्र्य व दडपशाही ह्यांचें थैमान चालू होतें. तरी निबिड अरण्यांत निर्भयतेनें संचार करणाऱ्या सिंहाप्रमाणें केसरी लोकांना धीर देत होता व सरकारला जाब विचारीत होता. ह्या कामीं टिळकांना खाडिलकरांची मदत फार होई.

पुढें १९०८ सालच्या जुलै महिन्यांत लो. टिळकांना सहा वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा झाली. त्यांची रवानगी मंडालेस झाली. धैर्यवंतांचा धीर खचला. कार्यकर्त्यांचीं कार्यें थंड झालीं. महाराष्ट्रांत अंधार पसरला. अशा वेळीं आशेची ज्योत तेवत ठेवण्याचें कार्य खाडिलकरांनीं केलें. ते केसरीचे संपादक झाले आणि तीन महिन्यांनंतर 'मराठा' ह्या इंग्रजी साप्ताहिकाचेही संपादक झाले. केसरींत लिहिण्याबद्दल शंकाच नव्हती, पण मराठ्यांत त्यांनीं जें इंग्रजी लिहिलें तेंही ठसठशीत होतें. त्यांनीं कांहीं भाषणेंही इंग्रजींत केलीं. तींही चांगलीं होतीं. समर्पक शब्द व सफाईदार उच्चार ह्यांमुळें त्यांचें इंग्रजी इतर महाराष्ट्रीय वक्त्यांप्रमाणें फिकें पडत नसे.

सुमारें दीड वर्ष केसरी-मराठा ह्या दोन्ही घोड्यांचे लगाम एकट्या काकासाहेबांच्या हातीं होते. पण 'कृष्णाचें' हें सारथ्य फार काळ टिकलें नाहीं. १९०९ सालीं नाशिक येथें जॅक्सनसाहेबाचा खून झाला. साहेबाचा खून झाला कीं सरकारनें केसरीवर डोळे वटारलेच ! त्यांत केसरीच्या ह्या संपादकाचा नेपाळ प्रकरणाशीं



तात्यासाहेब केळकर

संबंध असल्याचा संशय सरकारला पूर्वीपासूनच होता. तेव्हां खाडिलकर संपादक राहिले तर केसरी धोक्यांत येण्याचा संभव आहे, अशी माहिती मंडाले येथें लो. टिळकांच्या कानीं घातली गेली. ते तेथून काय सांगणार ? केसरी जगावा एवढीच त्यांची इच्छा. त्यावरील गंडांतर टाळण्यासाठीं खाडिलकरांनीं संपादकत्व सोडावें आणि केळकरांनीं संपादक व्हावें असें मत टिळकांनीं कळविलें. पडत्या फळाची आज्ञा घेऊन केळकर लगेच केसरीचे संपादक झाले. काकासाहेबांना त्याची दाद ना वार्ता. ते केसरीचीं मुद्रितें वाचीत होते. वाचतां वाचतां त्यांना संपादकाच्या जागीं केळकरांचें नांव दिसलें. सारें कारस्थान त्यांच्या ध्यानीं आलें. लगेच त्यांनीं तीं मुद्रितें भिरकावलीं आणि दणदण पावलें आपटीत जिना उतरून ते गायकवाड वाड्याच्या बाहेर निघून गेले. लोकमान्य मंडालेहून परत येईपर्यंत त्यांनीं गायकवाड वाड्यांत परत पाऊल टाकलें नाहीं.

त्याग, स्वाभिमान, बाणेदारपणा, इत्यादि ज्या ज्या उदात्त गुणांची पूजा ते आजवर करीत आले, त्या साऱ्या गुणांचा साक्षात्कारच त्यांच्या वर्तनांत ह्या वेळीं घडून आला. ता. १० जानेवारी १९१० रोजीं त्यांनीं केसरीचें संपादकत्व चटदिशीं सोडून दिलें – जसें कांहीं उपरण्याच्या टोकाला चिकटलेलें गवताचें पातें ! हरिश्चंद्र, रामचंद्र, रामशास्त्री ह्या त्यांच्या साऱ्या मानसपुत्रांनीं त्यांच्यावर स्वर्गातून

पुष्पवृष्टि केली असेल ! कारण केसरी सोडणें म्हणजे एक मामुली नोकरी सोडणें असें नव्हतें. सेवेचें व अधिकाराचें एक उच्च स्थान हातचें गमावणें असा त्याचा अर्थ होता. महाराष्ट्राच्या नेतृत्वाला मुकणें हा त्याचा स्वाभाविक परिणाम होता.

गांवांत वाघ शिरल्याची आवई उठली असतांना घरांतील मांजराला बाहेर घालवून वाघाच्या तोंडीं देण्यासारखें हें कृत्य होतें. काकासाहेब पुढें स्पष्टच म्हणाले, " सरकारची करडी नजर आहे हें कारण खरं मानलं तरी अशा वेळीं तुम्ही मला केसरी सोडावयास लावून उघडा करतां आहां. त्यांत ऑफीसला मोठेपणा नाहीं व मलाही संरक्षण नाहीं. "

काकासाहेबांची लेखणी एकेरी नव्हती. केसरीचें रणांगण तिला वर्ज्य झालें, तरी नाटकाचें क्रीडांगण तिला मोकळेंच होतें. केसरींत येण्यापूर्वीं, वकिलीचा अभ्यास चालू असतांनाच त्यांनीं " सवाई माधवराव ह्यांचा मृत्यु " हें नाटक लिहून कीर्ति मिळविली होती. शेक्सपियरच्या ऑथेल्लो व हॅम्लेट ह्या दोन्ही नाटकांतील स्वभावविशेषांचा संगम ह्या नाटकांत त्यांनीं घडवून आणला. ' कांचनगडची मोहना ' वगैरे नाटकांत नाट्यकला व राष्ट्रभक्ति ह्यांचा प्रीतिसंगमच झालेला आहे. पण १९१० सालीं परिस्थिति फार भयंकर होती. टिळक देशाबाहेर होते आणि देशांत दडपशाहीचें तांडव चालू होतें. ब्र काढला कीं ब्रह्महत्या, असें सरकार समजत असे. त्यामुळें खाडिलकरांनीं गद्य नाटकांची गदा बाजूस ठेवली आणि संगीताची सनई हातीं घेतली. तात्यासाहेब कोल्हटकरांमुळें ' किर्लोस्कर नाटक मंडळी 'त त्यांचें जाणेंयेणें सुरू झालें. त्या मंडळीच्या मागणीवरून

*****************



गणपतराव बोडस

खाडिलकरांनीं 'मानापमान' हें शृंगाररसानें थबथबलेलें व हास्यरसानें खदखदणारें नाटक रचलें. त्याचा पहिला प्रयोग मुंबईमध्यें १९११ च्या मार्चमध्यें झाला. ह्या नाटकामुळें नारायणराव राजहंस (बालगंधर्व), गणपतराव बोडस व नानासाहेब जोगळेकर हे तीन नट फार पुढें आले. पहिल्या सहा महिन्यांत ह्या नाटकावर किर्लोस्कर मंडळीला छप्पन्न हजार रुपये मिळाले.

नाट्य-रचनेच्या बाबत खाडिलकरांनीं जशी मेहनत घेतली होती, तशीच नाटक बसविण्याच्या बाबतींतही घेतली. दररोज दुपारीं तीन ते सहापर्यंत ते नियमानें नाटकाच्या तालमी घेऊं लागले. नट म्हणजे सामान्यत: अडाणी. त्याला आपल्या भूमिकांचें मर्म खाडिलकर एखाद्या पंतोजीप्रमाणें समजावून देत. त्यांच्या करडेपणाचा दरारा साऱ्या नटवर्गावर असे. ते स्वत: बोलत थोडें. पण दुसरा कोणी वावगें बोलला तर त्याची सडकून हजेरी घेत. त्यामुळें सारे नट त्यांच्यापुढें थरथरा कांपत. संगीत नाटकें चांगलीं लिहितां यावींत म्हणून काकासाहेबांनीं संगीताच्या अभ्यासासही सुरुवात केली. किर्लोस्कर मंडळीला पदांच्या चाली



नानासाहेब जोगळेकर

देणारे भास्करबुवा बखले ह्यांनीं पुण्यांत 'भारत गायन समाज' स्थापन केला. त्यांत खाडिलकरांनीं विद्यार्थी म्हणून आपलें नांव दाखल केलें. बरोबर पांचाच्या ठोक्यास ते 'समाजांत' जात. घरीं अष्टेकरबुवाही संगीत शिकवीत. सुमारें तीन वर्षें त्यांनीं संगीताचा असा कसून अभ्यास केला.



भास्करबुवा बखले

'मानापमान' नाटकांतील पदांच्या चाली श्री. गोविंदराव टेंबे ह्यांनीं दिल्या होत्या. त्याबद्दल खाडिलकरांनीं त्यांना आठशें रुपये देऊं केले. ते त्यांनीं नाकारले. तेव्हां खाडिलकरांनीं त्यांना असा सरळ हिशेब सांगितला, "आजपर्यंत मी माझ्या गद्य नाटकाची किंमत बारा आणे ठेवीत आलों आहें. तुमच्या नोटेशनमुळें मीं 'मानापमान' नाटकाची किंमत एक रुपया ठेविली आहे. अर्थात् हे चार आणे तुमचे आहेत."

संगीताची ही साधना चालू असतांनाच खाडिलकरांनीं 'महाराष्ट्र नाटक मंडळी'साठीं 'प्रेमध्वज' हें एक गद्य नाटक लिहून दिलें. ते नाटक तोंडानें सांगत व दुसरा माणूस लिहून घेत असे. त्यामुळें त्याच्या संवादांत सहजता अधिक आलेली



गोविंदराव टेंबे



अण्णासाहेब किर्लोस्कर

आहे. अवघ्या पंधरा दिवसांत त्यांनीं 'प्रेमध्वज' नाटक पुरें केलें. १९१३ सालीं काव्यकल्पनांनीं बहरलेलें त्यांचें 'विद्याहरण' नाटक किर्लोस्करांच्या रंगभूमीवर उभें राहिलें. ध्येयनिष्ठ विद्यार्थ्यांची प्रतिमा कचाच्या रूपानें खाडिलकरांनीं निर्माण केली आहे. "माझा हिंदुस्थान, माझा महाराष्ट्र वीरपुरुषांनीं केव्हां गजबजून जाईल, त्याचें यश उज्ज्वल स्वरूपानें केव्हां वावरूं लागेल अशी तळमळ कवींना लागून राहिलेली असते." असें खाडिलकर म्हणतात. निदान त्यांना तरी तशी तळमळ लागलेली होती हें खचित.

खाडिलकरांनीं आपली लेखणी नाट्याकडे वळविली; तरी राजकारणाकडे त्यांनीं पाठ फिरविली नाहीं. राष्ट्रसेवा व नाट्यसेवा हे जणूं त्यांचे श्वासोच्छ्वासच होते. त्या वेळीं बाल्कन युद्ध सुरू झालें होतें. त्या युद्धावरील लेखमाला त्यांनीं 'चित्रमय जगत्' ह्या मासिकामध्यें सुरू केली. पुढें १९१४ सालीं युरोपांत महायुद्ध पेटलें. त्यावरही त्यांनीं त्याच मासिकांत लेखमाला लिहिली. ह्या लेखमाला केवळ बातम्या सांगणाऱ्या नव्हत्या. खाडिलकर नुसतें भाषांतराचें काम करीत नसत. एखाद्या जबाबदार सेनापतीप्रमाणें, टेबलावर रणभूमीचा मोठा नकाशा पसरून, निरनिराळ्या राष्ट्रांच्या हालचालींचा ते सूक्ष्म अभ्यास करीत. त्यामुळें युद्धाच्या हालचालीचे


त्यांचे अंदाज अचूक ठरत. आपल्यासमोरच युद्ध घडत आहे असें वाचकांना वाटविण्याची शक्ति त्यांच्या लेखणींत होती. जगांत चाललेल्या पराक्रमांचा व उलथापालथींचा परिचय हिंदी तरुणांना झाला; तर तो आपल्या स्वातंत्र्य-संपादनालाही उपयोगी पडेल असा त्यांचा हेतु असे.

१९१४ सालच्या जून महिन्यांत लो. टिळक मंडालेहून सुटून परत पुण्यास आले. त्याबरोबर त्यांनीं खाडिलकरांना केसरीमध्यें बोलावून घेतलें. टिळकांच्या नेतृत्वाखालीं पुन्हा खाडिलकरांची लेखणी व वाणी महाराष्ट्र दुमदुमून सोडूं लागली. मंडालेच्या तपोभूमींतून लो. टिळक जें 'पायस' घेऊन आले तें म्हणजे 'गीतारहस्य.' त्या ग्रंथासंबंधीं खाडिलकरांनीं टिळकांशीं पुष्कळ चर्चा केली, बरीच मदतही केली. ह्याबद्दल लो. टिळकांनीं 'गीतारहस्याच्या' प्रस्तावनेंत असें लिहिलें आहे कीं,

"तसेंच रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांनीं ग्रंथाची लेखी प्रत वाचण्याची तसदी घेतली आणि बऱ्याच उपयुक्त व मार्मिक सूचना केल्या ह्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों."

गीतारहस्याच्या थोरवीचें रहस्य काय हें खाडिलकरांनीं स्वतः कुशलतेनें सांगितलें आहे. ते म्हणतात, "भगवद्गीतेच्या भक्तीमुळें टिळक अखेरीस स्वतः भगवद्गीता झाल्यावर त्यांनीं गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला. स्वराज्यवाद्यांचा पराक्रम उद्दीप्त करण्यास .... हा ग्रंथ अवतीर्ण झालेला आहे."

लोकमान्य टिळकांच्या बंदीवासाच्या काळांत राष्ट्रसभा मवाळांच्या हातांत होती. त्यांनीं तिला निर्जीव व निस्तेज करून टाकलेलें होतें.



# स्वतंत्र कर्तृत्व

लोकमान्य टिळक इंग्लंडहून १९१९ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत परत आले. ते येथें नव्हते अशा दीडदोन वर्षांच्या काळांत खाडिलकरांनीं केसरी मोठ्या प्रतिष्ठितपणें चालविला. ह्या अवधींतच महात्मा गांधींचा उदय हिंदी राजकारणांत प्रमुखत्वानें झाला. रौलेट कायदा, जालियनवाला बागेंतील हत्या, गांधीजींचा सत्याग्रह, ह्या सर्वांमुळें देशांतील राजकारण मोठ्या खळबळीचें होऊन राहिलें होतें. नवीन प्रश्न उपस्थित होत होते. त्या वेळीं केसरीनें कोणतें धोरण ठेवावें हें ठरविणें फार जोखमीचें होतें. तें बिकट कामही खाडिलकरांनीं चांगल्या तऱ्हेनें पार पाडलें. "कायदा

मोडणें ही गोष्टही प्रसंगीं वीरांना, महात्म्यांना व तपस्व्यांना भूषणदायक होईल." असें सांगून त्यांनीं वाचकांना अशी ठाम हमी दिली कीं "ह्यांत बिलकूल दोष नाहीं, प्रत्यवाय नाहीं, पूर्वींच्या कामाचा नाश नाहीं. निदान रौलेट कायद्याचें संकट टळेल." ठाशीव भाषेंत मार्गदर्शक मतें खाडिलकर कशीं मांडीत ह्याचा हा नमुनाच होय.



महात्मा गांधी

शिवाजीच्या काळाचा दाखला डोळ्यांपुढें ठेवून टिळक, खाडिलकर, वगैरे पुढारी आरंभीं आरंभीं सशस्त्र क्रांतीला जवळून-दुरून हातभार लावीत. खाडिलकरांची नेपाळ-स्वारी त्यासाठींच होती. पण पुढें त्यांना स्वच्छ दिसून आलें कीं एखाददुसऱ्या हिंदी तरुणानें बॉंब टाकून किंवा पिस्तुल झाडून, एकदोन गोऱ्या अधिकाऱ्यांचा खून करण्यानें आपल्याला स्वराज्य मिळणार नाहीं. तसेंच दहावीस क्रांतीकारकांच्या गुप्त मंडळ्या स्थापूनही कार्यभाग होणार नाहीं. आणि मोठें सशस्त्र बंड उभारणें हें तर अगदीं अशक्य. ब्रिटिश सरकारच्या नव्यानव्या व मोठमोठ्या शस्त्रांना तोंड देण्याचें सामर्थ्य बंडखोरांजवळ असणें शक्यच नव्हतें. ह्या तिन्ही मार्गांनीं स्वराज्य मिळणें आतां कठीण आणि यदाकदाचित् मिळालें तरी तें टिकविण्याचें सामर्थ्यही जनतेच्या अंगीं येणार नाहीं.

ह्यापुढचा कारभार तर लोकशाहीनेंच चालणार हें ब्रह्मवाक्य. म्हणून सर्व लोकांना उघड रीतीनें ज्यांत भाग घेतां येईल असा गांधीजींचा सत्याग्रहाचा मार्गच स्वराज्य मिळविण्यास उपयोगी पडेल अशी वालंबाल खात्री खाडिलकरांची झाली. टिळक विलायतेहून परत येतांच म्हणाले, " मी इथें असतों तर गांधीजींच्या चळवळींत भाग घेतला असता. "

नव्या सुधारणा आल्या तेव्हां नव्या चळवळी कराव्या लागणार, म्हणून केसरी द्विसाप्ताहिक करण्याचें टिळकांनीं १९२० सालीं ठरविलें. त्याचबरोबर केसरीचा ट्रस्ट करण्याचेंही ठरलें. त्या वेळीं टिळक खाडिलकरांना म्हणाले, " मीं केसरीचा ट्रस्ट करायचं ठरवलं आहे व तुम्हांला एक ट्रस्टी करणार आहें. तुम्ही रागीट आहां हें मला माहीत आहे, म्हणून तुम्हांला प्रथम विचारीत आहें. " खाडिलकरांनीं होकार दिला.

ह्याच वेळीं टिळकांनीं ' कॉंग्रेस लोकशाही पक्ष ' स्थापन केला. त्या पक्षातर्फे विधिमंडळाला उमेदवार म्हणून जे पुढारी टिळकांनीं उभे केले होते त्यांत खाडिलकर होते. ह्या दोन्ही घटनांवरून टिळकांचा खाडिलकरांच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हें स्पष्ट होतें. ह्या दोन नव्या घटनांची जबाबदारी शिरावर घेण्यापूर्वी खाडिलकरांच्या मनांत ' द्रौपदी ' नाटक लिहून पुरें करावयाचें होतें. म्हणून चार महिन्यांची रजा घेऊन ते १९२० च्या जूनमध्यें मुंबईस गेले. त्या निमित्तानें केसरीचे संपादक म्हणून त्यांचें नांव निघालें व केळकरांचें आलें. १९१० सालीं असा पालट झाला असतांना खाडिलकरांची संमति घेतलेली नव्हती. म्हणून ह्या वेळीं टिळकांनीं खाडिलकरांना

विचारलें, "तुमचं नांव तुम्हांला न कळत निघत नाहीं ना? तुमची संमति नसेल तर मला आतांच सांगा." खाडिलकरांची संमति ह्या वेळीं होती, पण ह्या वेळीं त्यांचा केसरी जो सुटला तो कायमचाच! कारण ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं लो. टिळक देवमान्य झाले. पुढें कलकत्ता काँग्रेसच्या ठरावाप्रमाणें खाडिलकरांनीं विधिमंडळाची उमेदवारीही परत घेतली.

केसरी निसटला, निवडणूक रहित झाली, टिळक दिवंगत झाले आणि खाडिलकर एकाकी उरले, पोरके राहिले, उघडे पडले. केसरीच्या संपादकत्वासाठीं व विश्वस्तपणासाठीं झोंबाझोंबी करणें त्यांच्या करारी स्वभावाला अप्रशस्त वाटलें.

लो. टिळकांचें स्मारक म्हणून मुंबई येथें १९२१ च्या मार्चमध्यें 'लोकमान्य' नांवाचें दैनिक निघालें. त्यासाठीं कांहीं टिळकभक्तांनीं एक कंपनी काढली होती. त्यांनीं खाडिकरांनाच लोकमान्याचे संपादक नेमलें. त्या पत्रावर खाडिलकरांनीं स्वतः रचलेला टिळकवर्णनपर पुढील श्लोक घातला:

देशोद्धारे प्रवीण टिळकसुचरितं ध्यायते तद्वरेण्यम् ।
उद्दीप्तं राष्ट्रभक्त्या जनपदहृदयं यस्य कारानिवासैः ॥
बद्धाकांक्षः स्वराज्ये परिणतवचसा भारतो यस्य जातः ।
दद्यो गीतारहस्ये विमलयतु गुरुः नो धियो लोकमान्यः ॥

ह्यावरून खाडिलकरांची टिळकांविषयींची गाढ भक्ति उघड होते.

खाडिलकरांनीं 'लोकमान्य' दैनिक फार कुशलतेनें चालविलें. गांधीवादाचा प्रचार ते ठोसरपणें करीत. दैनिकाच्या सर्व खात्यांवर ते जातीनें देखरेख करीत. वर्षाच्या अखेरीस दैनिकाचा खप वीस


'सुधारक' कर्ते आगरकर

हजारांपर्यंत गेला. त्या वेळीं मराठी वृत्तपत्रसृष्टींत हा मोठाच विक्रम होता. नाटकांत काय किंवा वृत्तपत्रांत काय, लोकप्रियता खाडिलकरांना सहजच मिळे. ह्या असामान्य यशामुळेंच कीं काय, लोकमान्य पत्राच्या कंपनींतील कांहीं लोकांचें पोट दुखूं लागलें. त्यांनीं खाडिलकरांच्या स्वातंत्र्यावर बंधनें घालण्यास सुरुवात केली. तीं खाडिलकरांच्या बाणेदार स्वभावाला कशीं मानवणार? त्यांनीं अवाक्षर न काढतां, रात्रीं बारा वाजतां 'लोकमान्य' कचेरींतून पाय बाहेर काढला. ही गोष्ट १९२३ च्या मार्चमध्यें घडली. दुसऱ्या दिवशीं "पुढें काय?" असा प्रश्न त्यांच्या पत्नीनें केला. त्यांनीं चटकन् उत्तर दिलें, "दुसरं पत्र काढायचं 'नवा काळ' ह्या नांवाचं!" एका वाक्यांत सारा निकाल.

पुढील महिन्यांतच 'नवा काळ' दैनिक निघालें. त्यांत किती अडचणी, किती हाल, किती परिश्रम! स्वतःच्या जबाबदारीवर खाडिलकरांनीं काढलेलें हें पहिलेंच पत्र. केसरींतून बाहेर पडून स्वतंत्र पत्र काढून तें प्रभावी करणारे 'सुधारकाचे' संपादक आगरकर हे पहिले! दुसरे खाडिलकर. त्यांच्या स्वतंत्र कर्तृत्वाची कसोटी आतां लागत होती. ह्या सत्त्वपरीक्षेंत टिकून ते पुरेपूर उतरले. 'नवा काळ'ची सारखी भरभराटच होत गेली. लोकमान्य टिळकांचें चित्र देऊन 'न मे भक्तः प्रणश्यति।' हें गीतावचन



बाळासाहेब खेर

ब्रीदवाक्य म्हणून खाडिलकरांनीं 'नवा काळ' पत्रावर ठेवलें. लोकमान्यांवर त्यांची भक्तिच तशी विलक्षण होती. पेण येथें १९२२ सालीं महाराष्ट्र प्रांतिक परिषद भरली होती. तिचे अध्यक्ष खाडिलकर होते. त्या वेळीं, त्यांनीं आपल्या भाषणांत आपली ही टिळक-भक्ति पुढील शब्दांनीं जाहीर केली, "लोकमान्यांची देवता विठोबाच्या मूर्तीइतकी महाराष्ट्राला प्रिय आहे व मलाही ती माझ्या माउलीइतकीच प्रिय आहे."

१९२७ सालीं सोलापूर येथील दंग्याची बातमी छापल्यामुळें 'नवा काळ' वर खटला झाला. त्यांत खाडिलकरांना सातशें रुपये दंड झाला व पोलीस सुपरिंटेंडेंटला १५०० रुपये अब्रुनुकसानी-बद्दल द्यावे लागले.



वासूकाका जोशी

१९२९ सालीं मुंबईंत दंगे झाले. ह्या दंग्यांची जबाबदारी सरकारवरच आहे, असें खाडिलकरांनीं खडखडीत-पणानें एका लेखांत सरकारला बजावलें. सरकारनें त्यांच्यावर खटला भरला. श्री. बाळासाहेब खेर ह्यांनीं काकासाहेबांचें काम हायकोर्टांत विनामूल्य चालविलें. काकासाहेबांना जामिनावर सोडण्यासाठीं चित्रशाळेचे वासूकाका जोशी ह्यांनीं

आपल्या खादीच्या सदऱ्याचा खिसा जबर रकमेनें भरून आणला होता. खटला सेशन कमिट झाला. तेथें भुलाभाई देसाई खाडिलकरांच्या बाजूनें काम करीत होते. ज्यूरीनें बहुमतानें खाडिलकरांना दोषी ठरविलें. न्यायमूर्तींनीं एक वर्ष साधी कैद व २००० रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं ज्या लेखाबद्दल ही शिक्षा खाडिलकरांना झाली तो लेख खाडिलकरांनीं लिहिलेला नव्हता, दुसऱ्यानें लिहिलेला होता. खुद्द खाडिलकरांच्या लेखांचें प्रायश्चित्त टिळकांना दोनदा मिळालें होतें. त्याची भरपाईच जणूं कांहीं नियतीनें आतां केली. ह्या शिक्षेच्या वेळीं खाडिलकरांचें वय ५८ वर्षांचें होतें, तरी त्यांनीं शांत मनानें ती शिक्षा स्वीकारली. त्यांच्या हातांत बेड्या घातलेल्या होत्या. त्यांचा हातकड्यांसहचा फोटो दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला. खाडिलकरांना अहमदाबादच्या तुरुंगांत ठेवलें होतें. ते दिवस उन्हाळ्याचे होते व अहमदाबादला उन्हाळा कडक असतो. त्या वेळीं तुरुंगांत अ, ब, क अशी वर्गवारी नव्हती. ह्यामुळें तुरुंगांतील हालांचा काकासाहेबांना पुरेपूर अनुभव आला.

स्वतःचें बोचकें स्वतःच घेऊन, खाडिलकर ता. १७ जानेवारी १९३० रोजीं तुरुंगांतून बाहेर आले. प्रथम ते महात्माजींच्या आश्रमांत गेले. काकासाहेबांचा अहमदाबाद येथें जाहीर सत्कार झाला. दुसऱ्या दिवशीं मुंबईस आल्यावर तर त्यांचें प्रचंड स्वागत झालें. पुढें पुणें, सातारा, सांगली, वगैरे शहरीं त्यांचे सन्मान-समारंभ झाले. "टिळकांचे खरे शिष्य! त्यांचें नांव राखलें!!"

असें लोक प्रेमभरानें बोलूं लागले. ह्या वेळीं नवा काळच्या खपानें उच्चांक गांठला होता. काकासाहेबांचे चिरंजीव अप्पासाहेब ह्यांनीं नवा काळची धुरा समर्थपणें वाहाण्यास सुरवात केली होती. 'स्वाधीन भारत' ह्या नांवाचें हिंदी दैनिक आणि एक इंग्रजी मासिक काढण्याचें काकासाहेबांनीं योजिलें होतें. १९३१ सालीं त्यांनीं 'नवाकाळवाडी' खरेदी केली. शिवाजीच्या काळीं स्वतंत्र राज्य स्थापण्यासारखीच ही बहादुरी तारीफ करण्यासारखी होती.



अप्पासाहेब खाडिलकर

कीर्तीच्या व समृद्धीच्या शिखरास काकासाहेब पोचले होते. त्यांतच १९३२ सालीं त्यांच्या वयाला साठ वर्षें पूर्ण झालीं. तेव्हां षष्ठ्यब्दिपूर्तीचा समारंभ करावा, अशी योजना त्यांच्या चहात्यांनीं आंखली. पण काकासाहेबांनीं निक्षून नकार दिला. होकाराची लज्जत वाढविणारा तो नकार नव्हता. 'नाहीं मी बोलत आतां' असें म्हणून अधिक बोलण्याची सवलत मिळविण्याचा तो प्रकार नव्हता. गांधीजींच्या कायदेभंगाच्या लाटा देशभर उसळत होत्या. सरकारच्या लाठ्या देशभक्तांच्या पाठी सडकत होत्या. सुमारें लाख लोक तुरुंगांत डांबले गेले होते, तरीही त्याच वेळीं आपल्या साठी-समारंभाची आरती ओवाळून घेण्याची वृत्ति काकासाहेबांच्या अंगीं नव्हती. गीतेंतील अमानित्वाचा गुण त्यांच्या अंगीं पूर्णपणें बाणलेला होता.

## स्वतंत्र कर्तृत्व

******************




मोतीलाल नेहरू

आपला बाणेदारपणा टिकविण्यासाठीं खाडिलकर कोणतीही किंमत द्यावयास तयार असत. त्यांचें 'कीचकवध' नाटक महाराष्ट्र नाटक-मंडळीनें बसविलें होतें. पुढें तें जप्त झालें. नंतर कांहीं वर्षांनीं त्या नाटक-मंडळीनें ती जप्ती उठविण्याचा प्रयत्न केला, तो मध्यप्रांतांत यशस्वी झाला. तेथील सरकारनें जप्ती उठविली. नाटकाचे प्रयोग रंगभूमीवर पुन्हा होऊं लागले. पैसा चिकार मिळूं लागला. तेव्हां नाटक-मंडळीनें खाडिलकरांना जादा मोबदला देऊं केला, पण त्यांनीं तो नाकारला. तरीही त्यांनीं कांहीं रक्कम पाठविलीच. ती खाडिलकरांनीं जमा करून घेतली, पण पुढील नाटकाच्या खातीं, कीचकवधाच्या खातीं नव्हे.

खाडिलकरांनीं मुंबईस 'नवा काळ' पत्र चालू केलें तेव्हांची गोष्ट. पंडित मोतीलाल नेहरू स्वराज्यपक्षाचे प्रमुख होते. त्यांना आपल्या पक्षाचा प्रचार करणारें मराठी पत्र हवें होतें. 'नवा काळ' तसा प्रचार करीतच होतें. म्हणून पंडितजींनीं खाडिलकरांना आपल्या भेटीस बोलाविलें. खाडिलकरांना देण्यासाठीं पंडितजींनीं दहा हजार रुपयांचा चेक तयार ठेवला होता. पण काकासाहेब पैसे घेण्यास तयार नव्हते. म्हणून पंडितजींनीं अधिक रक्कम देण्याची तयारी दाखविली. तेव्हां काकासाहेबांनीं उत्तर दिलें, "मी तुमचंच काम करीत आहें व पुढेंही करीन. त्याला पैसे काय करावयाचे?"

## पुरचुंडींत काय होतें?



वीर वामनराव जोशी

पुढें 'नवा काळ' ला अडचणींचा प्रसंग आला. दहा हजार रुपयांची गरज होती. काँग्रेसभक्तांकडून तेवढी रक्कम वर्गण्या व देणग्या ह्यांच्या रूपानें मिळाली असती. पण काकासाहेबांना तसें दान नको होतें. त्यांनीं कर्ज काढलें व तें पुढें फेडलेंही.

अहमदाबादच्या तुरुंगांतून काकासाहेब सुटल्यावर त्यांच्या सत्कारासाठीं त्यांना एक थैली द्यावी, असा त्यांच्या मित्रमंडळींनीं बेत केला. तो काकासाहेबांना कळतांच त्यांनीं तो निक्षून मोडून काढला. डाह्याभाईंची सौधाची सूचनाही त्यांनीं अशीच फेटाळून लावली.

पाणपोईंत पाणी पिणें पापाचें पण पाणपोई घालणें पुण्याचें. तशीच वृत्ति काकासाहेबांचीही होती. ते स्वतः दान घेत नसत पण देशसेवेसाठीं दान देण्याला अडचणीच्या काळींही तत्पर असत. १९०९ सालीं 'राष्ट्रमत' नांवाचें दैनिक मुंबईस चालू होतें. तें टिळकांनीं सुरू केलेलें व राष्ट्रीय पक्षानें चालू ठेवलेलें होतें. तें आंतबट्ट्यांत चाललेलें. पैशाची नड नेहमींची. म्हणून त्या दैनिकांत काम करणारे वीर वामनराव जोशी पुण्यास खाडिलकरांकडे गेले व त्यांनीं मदतीची मागणी केली. मागणी ऐकतांच खाडिलकर माडीवरून खालीं गेले आणि वामनरावांच्या हातांत पांढऱ्या हातरुमालाची एक छोटीशी पुरचुंडी त्यांनीं ठेवली.

त्या पुरचुंडींत काय होतें?

त्यांच्या पत्नीचे दोनचार दागिने !

त्या वेळीं खाडिलकर दरिद्री होते, बेकार होते. केसरींतून ते निघाले होते आणि त्यांच्या कनवटीला रोख पैसा नव्हता.

वामनराव चाणाक्ष. त्यांनीं त्या दागिन्यांचा सारा इतिहास जाणला. त्यांना गहिंवर आला. कापऱ्या स्वरांत ते म्हणाले, " कृष्णाजीपंत, ह्या दागिन्यांना मला स्पर्श करवत नाहीं. आमच्याकडून मोठाच प्रमाद घडला. आम्हांला क्षमा करा. "

काकासाहेब म्हणाले, " असं वेड्यासारखं काय करतां ? माझ्या पत्नीनें हे दागिने खुशीनें दिलेले आहेत. तुम्हांला संकोच करण्याचं मुळींच कारण नाहीं. देशासाठीं ही माझी फूल नाहीं फुलाची पाकळी घ्या. "

ह्या औदार्यानें चकित होऊन वामनराव भराभर जिना उतरून घराबाहेर पडले आणि झपाझप रस्ता चालूं लागले. हरिश्चंद्र व रामचंद्र ह्यांचीं पात्रें रंगविण्याची लायकी काकासाहेबांचीच, असें त्यांच्या मनांत आलें असेल.



# भरत वाक्य

पन्नास वर्षांपूर्वी, सांगली येथें, कृष्णा नदीच्या कांठीं हुतूतू खेळणारा हूड व हट्टी कृष्णा ! आणि कृष्णानदीच्या पलीकडे लहानसें दत्तमंदिर बांधून तेथील पवित्र वातावरणांत शांत स्वरानें रुद्रावर व उपनिषदांवर गंभीर प्रवचनें करणारे वृद्ध कृष्णाजीपंत !

एका जीवाचा झालेला हा विकास कृष्णामाईनें आनंदानें पाहिला. तो पाहून सांगली शहराला धन्यता वाटली. लो. टिळक व म. गांधी ह्या दोन्ही राष्ट्रनेत्यांचें शिष्यत्व स्वीकारून व गाजवून विश्रांतीसाठीं आलेले देशभक्त खाडिलकर; केसरी, लोकमान्य व नवा काळ ह्या तीन पत्रांचे धुरंधर म्हणून मान्यता पावलेले संपादक



## डोळ्यांचें पारणें फिटलें

*****************

काकासाहेब; गद्य व संगीत अशा दोन्हीही नाट्य-लेखनांत अलौकिक यश व धन संपादून नाट्यकलेला राष्ट्रसेवेसाठीं राबविणारे नाटककार कृष्णाजीपंत, सांगलीच्या इतिहासांत ह्या व्यक्तीचें नांव सोन्याच्या अक्षरांनींच लिहिलें गेलें. १९३३ च्या मे महिन्यामध्यें खाडिलकरांनीं सांगली येथें दत्तमंदिर बांधलें. तें स्पृश्यास्पृश्यादि सर्वांना खुलें होतें. तेथें ते वानप्रस्थाप्रमाणें राहात. क्रांतिवादांतून गांधीवादाकडे व गांधीवादाकडून अध्यात्मवादाकडे त्यांचें मन विकास पावत गेलें. त्यांच्या पत्नी १९४५ च्या मार्चमध्यें निधन पावल्या.

'महाराष्ट्र साहित्य संमेलन' नागपूर येथें १९३३ सालीं भरलें होतें. त्याचें अध्यक्षस्थान खाडिलकरांना देण्यांत आलें. मराठीच्या सेवेकऱ्यांना त्यांनीं तत्त्वनिष्ठा, स्वार्थत्याग व स्वावलंबन ह्या तीन गुणांचा स्फूर्तिदायक संदेश दिला.

१९४७ च्या १५ ऑगस्टचा स्वातंत्र्य-महोत्सव पाहून खाडिलकरांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. आपल्या जीविताचें सार्थक झालें, आपल्या त्यागाचें चीज झालें, असें वाटून त्यांचें हृदय उचंबळून आलें. त्यांचें शरीर अर्धांग वायूनें पीडलेलें होतें, तरी गाडींत बसून, मुंबई शहरांत फेरी मारून ते स्वातंत्र्याचा सोहळा पाहून आले. स्वातंत्र्याचीं तीं तिरंगी निशाणें रस्त्यारस्त्यावर व घरांघरांवर डौलानें डोलतांना पाहून त्यांचें मन आनंदानें नाचूं लागलें आणि "आजि मेळविलों जन्म-फळां" अशी आनंदाची आरोळी ठोकूं लागलें.

## भरतवाक्य

*****************

सांगली हायस्कूलमध्यें त्रिसुपर्णावर व्याख्यान देतांना काकासाहेबांनीं काढलेले उद्गार म्हणजे एका थोर देशभक्तानें भावी पिढ्यांना दिलेला संदेशच होय. ते म्हणाले, “आपण भाग्यवानाच्या जन्मास आलेले आहांत. डोंगराएवढें काम तुमच्यापुढें पडलेलें आहे. आमच्या वेळचं कार्य त्या मानानें अगदीं क्षुल्लक. तुमच्यापुढील कार्य फार मोठं आहे. पन्नास वर्षांनंतर आपण छातीला हात लावून सांगाल कीं माझ्या हातानें मीं हा देश मिळविला आहे, मीं ह्या देशाची उभारणी केली आहे.”

१९४८ सालच्या टिळक-पुण्यतिथीस काकासाहेबांनीं मुंबईच्या नभोवाणीवर एक भाषण केलें आणि त्याच महिन्याच्या २६ तारखेस आपल्या गुरूच्या भेटीसाठीं त्यांनीं स्वर्गी प्रयाण केलें. ह्या त्यागी राष्ट्रभक्ताला, झुंझार संपादकाला व ध्येयवादी नाटककाराला महाराष्ट्रांतील कोनाकोपऱ्यांतूनही प्रेमभरानें व भक्तिभावानें श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आली.

म. अ. स. पुणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 3830 नों. दि ..............
वि. .................. क्र. ..................
IRBK-0103830
IRBK-0103830

# महाराष्ट्राचे संजीवक

लेखक — दा. न. शिखरे, एम्. ए.

१ लोकमान्य टिळक
२ न्यायमूर्ति रानडे
३ सार्वजनिक काका
४ मालाकार चिपळूणकर
५ 'सुधारक' कर्ते आगरकर
६ साहित्यसम्राट् केळकर
७ महान् मुत्सद्दी ना. गोखले
८ काकासाहेब खाडिलकर
९ 'काळ' कर्ते परांजपे
१० स्वातंत्र्यवीर सावरकर
११ सेनापति बापट
१२ सन्त साने गुरुजी

**मूल्य प्रत्येकीं आठ आणे**

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ - सदन
गिरगांव, मुंबई

छत्रपति शिवाजीमहाराजांनीं महारा
जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दि
इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. तें सिंह
परत मिळविण्यासाठीं असंख्य नररत्नें झ
व झगडलीं हें आपलें केवढें भाग्य!

आतां आपल्याला नवा भारत,
महाराष्ट्र उभारावयाचा आहे. त्यासाठीं पु
पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें,
श्रद्धास्थानें ठेवलीं पाहिजेत. ध्येयनि
सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें
नव्या पिढीच्या नसांतून खेळेल तरच आ
भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शके

ह्या गुणांचें बीजारोपण करावया
त्या गुणांचे पुतळे असलेल्या
चरित्रें नव्या पिढीला सांगणें. मह
संजीवन देणाऱ्या बारा विभूतींचीं च
श्री. शिखरे यांनीं मुद्दाम लिहिलीं आ
श्री. शिखरे यांनीं तीं कशीं लिहि
असतील हें लिहिणें नलगे.

## केशव भिकाजी ढवळे, मुंबई